# सोयाबीनची उगवण नाही

## बियाण्याविरोधात समुद्रपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारी उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांनी दिले पंचनाम्याचे आदेश

**वर्धा (प्रतिनिधी) :** चालू हंगामात महाबीजच्या जेएस ९५६० जातीच्या सोयाबीन बियाण्याची उगवण न झाल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आतापर्यंत १६ शेतकऱ्यांनी उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयाकडे तक्रारी केल्या असून यात बहूतांश तक्रारी समुद्रपूर तालुक्यातील आहेत.

शेतकऱ्यांच्या वाढत्या तक्रारींमुळे उपविभागीय कृषी अधिकारी गोविंद मोरे यांनी शेतकऱ्यांना भेटी देऊन आढावा घेतला आहे. समुद्रपूर तालुक्यातील डोंगरगाव, घोरपड, अंतरगाव, वाघेडा येथील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांकडे श्री. मोरे यांनी पाहणी केली. या पाहणीत त्यांना सोयाबीन बियाण्यांची उगवण न झाल्याचे निदर्शनास आले. उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. परिस्थिती लक्षात घेता त्यांनी या शेतांचे पंचनामे करण्याचे आदेश संबंधित कर्मचाऱ्यांना दिले आहेत.



सोलापूर : संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे शनिवारी (ता. ९) जिल्ह्यात आगमन झाले. पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते पालखीप्रमुख व इतर मानकरी यांचा फेटा बांधून, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्यासह सर्व मान्यवरांनी माउलींचे दर्शन घेतले. माउलींचे आगमन होताच या भागातील वातावरण काही काळ उत्साह आणि भक्तीने भारून गेले.

# अॅग्री डीलर्स एक्स्पोचा आज शेवटचा दिवस

**पुणे (प्रतिनिधी) :** सकाळ-अॅग्रोवनच्या वतीने आयोजित पहिल्या अॅग्री डीलर्स एक्स्पोला दुसऱ्या दिवशी राज्याच्या विविध भागांतील उदयोन्मुख उद्योजकांनी डीलरशिप घेण्यासाठी गर्दी केली होती. गेल्या दोन दिवसांत सुमारे तीन हजार जणांनी डीलरशिपसाठी चौकशी करून नोंदणी केली. या एक्स्पोमधून अनेकांचे डीलरशिपच्या माध्यमातून व्यवसायाचे स्वप्न साकार होणार आहे. आज (रविवारी, ता. १०) एक्स्पोचा शेवटचा दिवस आहे.

### एक्स्पोमध्ये सहभागी कंपन्या आणि त्यांची उत्पादने

- **डॉ. बावसकर टेक्नॉलॉजी (अॅग्रो) प्रा. लि.** : शेवगा बियाणे, सेंद्रिय उत्पादने
- **पूर्वा केमिकल्स प्रा. लि.** : वनस्पती वाढ नियंत्रणे (पी.जी.आर.), कीटकनाशके
- **रोहित स्टील वर्कस** : पेरणी यंत्र, ड्रीलर, कृषी अवजारे
- **एस्कॉर्ट** : ट्रॅक्टर
- **अॅक्वॉ संव्हिओ, एव्हालॉक एव्हामल्च** : शेततळ्यातील पाण्याची बाष्पीभवन रोखणारी रसायने
- **होंडा सिएल पॉवर प्रॉडक्टस लि.** : जनरेटर, पंपसेट
- **एल.जी. इंजिनिअरिंग** : ठिबक सिंचनाची प्लॅस्टिक उत्पादने
- **सीएट टायर्स** : सर्व प्रकारच्या वाहनांचे टायर्स
- **मल्टिलाइन अॅग्रो इंडस्ट्री** : वनस्पती वाढ नियंत्रणे (पी.जी.आर.), कीटकनाशके
- **अनुमित मार्केटिंग** : रोटारेझॉर
- **गुरुदत्त अॅग्रो एजन्सीज** : पॉवर टुल्स, ठिबक सिंचन, स्प्रेअर, पंप, कटर, ड्रीलर इत्यादी
- **साईदीप फोम प्रा. लि.** : मल्चिंग पेपर
- **आयरीस पॉलिमर** : मल्चिंग पेपर, ग्रीन हाउस कव्हरिंग फिल्म इत्यादी
- **प्रदीप नॉनओवन** : उन्हापासून फळांचे संरक्षण करणारी नेट,
- **विदर्भ सेल्स** : पशुखाद्य तयारी करणारी मशिन, खतनिर्मिती
- **फोर्स मोटर्स लि.** : ट्रॅक्टरसह विविध वाहने
- **अजिको अॅग्रोटेक प्रा.लि.** : चिखलणी मशिन, सोयाबीन लावणी मशिन

# माउलींची पालखी सोलापूर जिल्ह्यात

## भक्तिमय वातावरणात उत्साही स्वागत

## संत तुकाराम महाराज पालखीचे आज आगमन

**नातेपुते, जि. सोलापूर (प्रतिनिधी) :** टाळ-मृदंगाचा गजर आणि ज्ञानोबा-तुकाराम असा नामघोष करीत टीपेला गेलेला स्वर, पंढरी जवळ आल्याने विठुरायाच्या दर्शनाची वाढलेली ओढ, असा एक वेगळाच उत्साह आणि भक्तीने भारलेल्या वातावरणात शनिवारी (ता. ९) सकाळी पावणेअकराच्या सुमारास धर्मपुरी कॅनॉलनजीक (ता. माळशिरस) श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीने सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले. जिल्हा प्रशासनाने मोठ्या उत्साहात पालखीचे स्वागत केले.

सोलापूर-सातारा जिल्हा सरहद्दीवर धर्मपुरी कॅनॉलनजीक पालकमंत्री विजयकुमार देशमुख, नवनियुक्त मंत्री सुभाष देशमुख, आमदार प्रशांत परिचारक, हनुमंत डोळस, रामहरी रूपनवर यांच्यासह विविध मान्यवरांनी पालखीचे स्वागत केले. सोलापूर जिल्ह्यातील माउलींच्या आगमनामुळे सकाळपासूनच या परिसरात अनेक मान्यवरांसह वारकरी मोठ्या संख्येने गर्दी करत होते. माउलींचा व स्वारांचा अश्व जिल्ह्यात सकाळी साडेदहाला आला. पावणेबाराच्या सुमारास माउलींचा रथ आला. सोलापूर जिल्ह्यातर्फे पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांचे हस्ते पालखीप्रमुख व इतर मानकरी यांचा फेटा बांधून श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्यासह सर्व मान्यवरांनी माउलींचे दर्शन घेतले. माउलींचे आगमन होताच या भागातील वातावरण काही काळ उत्साह आणि भक्तीने भारून गेले. दहा-बारा दिवसांचा अखंड प्रवास करूनही वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.




### पुरंदावडेत आज गोल रिंगण

माउलींच्या पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण रविवारी (ता. १०) दुपारी एक वाजता पुरंदावडे येथील शेती महामंडळाच्या जागेवर होणार आहे. हे गोल रिंगण अतिशय रेखीव व शिस्तबद्ध होत असल्याने राज्यभरातून वारकऱ्यांसह भाविक या ठिकाणी आवर्जून उपस्थिती लावतात. सदाशिवनगर येथील रिंगणाच्या जागेबाबत गेल्या दोन वर्षांपासून तांत्रिक अडचणी असल्याने यंदा पुरंदावडेमध्ये गोल रिंगण रंगणार आहे.

### तुकोबारायांचे आज आगमन

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखीचे आज (रविवारी) सोलापूर जिल्ह्यात आगमन होत आहे. सराटी (ता. माळशिरस) येथे सकाळी अकराच्या सुमारास पालखीचे आगमन होईल. त्या वेळी जिल्हा प्रशासनाकडून पालखी सोहळ्याचे स्वागत होईल. पालखीचा रविवारचा मुक्काम अकलूज येथे असेल.



नाशिक : अनेक दिवसांनंतर पावसाने हजेरी लावल्याने पेरणीसाठी लगबग सुरू झाली असून गिरणारे परिसरात जमिनीची मशागत करताना शेतकरी. (छायाचित्र : केशव मते)

# 'सकाळ'च्या बातमीदारावर हल्ल्याप्रकरणी छावणी ठेकेदारासह दोघांना अटक

**सांगली (प्रतिनिधी) :** चारा छावणीत निकृष्ट चाऱ्यामुळे तेरा जनावरांचा मृत्यू झाल्याचे प्रकरण उघडकीस आणून चौकशीचा ससेमिरा मागे लावल्याच्या रागातून दै. 'सकाळ'चे माडग्याळ (ता. जत, जि. सांगली) येथील बातमीदार दत्ता सावंत (वय ४६) यांच्यावर गावातीलच छावणीचा ठेकेदार तथा शिवसेनेचा तालुका उपप्रमुख प्रदीप करगणीकर याच्यासह दोघांनी हल्ला केला होता. या प्रकरणी प्रदीप करगणीकर आणि अशोक माळी या दोघांना अटक झाली असून, त्यांना सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या घटनेचा ठिकठिकाणच्या पत्रकारांनी निषेध केला आहे.

दत्ता सावंत यांनी माडग्याळ येथील दूध संस्थेच्या माध्यमातून चालवल्या जात असलेल्या चारा छावणीतील निकृष्ट चाऱ्याचे प्रकरण उघडकीस आणले. बारा जनावरांचा मृत्यू झाल्याची बातमी दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने या प्रकरणी चौकशीचे आदेश तहसीलदार आणि प्रांतांना दिले. त्यात तथ्य असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर दोन दिवसांनी आणखी एका बैलाचा मृत्यू झाला. त्याचीही बातमी 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध झाली. ही छावणी चालवण्यात प्रदीप करगणीकरचा पुढाकार आहे. तो या प्रकरणात चिडून होता. त्याचा राग मनात धरून करगणीकर याच्यासह ग्रामपंचायत सदस्य अशोक माळी यांनी दत्ता सावंत यांच्यावर हल्ला केला.